<u>*राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक*</u>

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**क्र. रामाआ-नाशिक/तक्रार क्र :५८६/२०२१/नंदुरबार**

| तक्रारदार | प्रतिवादी |
|---|---|
| श्री. मोतीलाल सुरतसिंग ठाकूर,<br>रा. हरिश्चंद्र नगर, चाळ नं.५, रुम नं.२, सुजय जोशी ज्योतीष कार्यालयासमोर, आशाळेगाव रोड, उल्हासनगर-४, जि.ठाणे | संशोधन अधिकारी,<br>अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती,<br>साक्री रोड, आर.टी.ओ. जवळ,<br>नंदुरबार, ता.जि.नंदुरबार-४२५४१२ |

**<u>सुनावणी दिनांक ३०/०१/२०२४</u>**

तक्रारदार यांनी दिनांक २१/०९/२०२१ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. त्यामध्ये दिनांक ३०/०१/२०२४ रोजी आयोजित सुनावणीसाठी विद्यमान जन माहिती अधिकारी उपस्थित असून तक्रारदार अनुपस्थित आहेत.

२) तक्रारदार यांनी दिनांक २१/०९/२०२१ रोजीच्या तक्रार अर्जात असे नमुद केले आहे की, आयोगाच्या आदेशानुसार अद्याप कोणतीही माहिती दिलेली नाही.

३) आयोगाने द्वितीय अपील क्रमांक द्वितीय अपील क्रमांक ३४०५/२०१९/नंदुरबार वरील निर्णय दिनांक २०/०९/२०२१ रोजी पुढीलप्रमाणे आदेश दिले आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा संधोधन अधिकारी, श्री. एस.एल. हिप्परगे यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २५/०६/२०१९ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात कागदपत्रांच्या प्रती मा.उच्च न्यायालयाकडून प्राप्त करुन घ्याव्यात आणि सदर माहिती नोंदणीकृत पोचदेय डाकेने विनामूल्य पुरवावी.

४) सुनावणीवेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असे नमूद केले की, आयोगाच्या आदेशानुसार तक्रारदार यांनी मागणी केलेली माहिती शासकीय अभियोक्ता मा. उच्च् न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडून मागवुन दि. १४/१२/२०२१ अन्वये पुरविली आहे. अपिलार्थीच्या दि. २९/०१/२०२४ च्या लेखी निवेदनात माहिती मिळाली परंतु विलंबाने मिळाली असे नमूद आहे.त्यामुळे सदर तक्रार पुढील चौकशी योग्य नाही.

सबब, याप्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

प्रस्तुत तक्रार क्रमांक ५८६/२०२१/नंदुरबार निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग खंडपीठ नाशिक

**(भुपेंद्र गुरव)**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

जावक क्र अो-८८९ 2 8 MAR 2024